मे २००१

# रिझर्व बँकेच्या धोरणाने सहकारी बँका डबघाईस येण्याची भिती

आज देशाच्या प्रगतीचा कणा म्हणजेच सहकार क्षेत्र होय. आणि सहकारी क्षेत्रात सर्वाधिक देशाची उन्नती ज्या माध्यमातून होते, त्या सहकारी बँका. या बँका म्हणजे आज भारताच्या विकासाचा खराखुरा पाया आहे. सामान्यातला सामान्य माणूस आज सधन होत चालला आहे. या सहकारी बँकांमुळे भारत विकसनशील होत आहे; त्या नागरी सहकारी बँकांच्या पायावरच रिझर्व्ह बँकेने घाला घालण्याचा कुटील डाव आखला आहे.

आमच्या मते सध्या जो काही बँक घोटाळा (माधवपुरा बँक) उघडकीस आला आहे, त्याला सर्वस्वी रिझर्व्ह बँकच जबाबदारी आहे. असे आम्हांला म्हणावयाचे आहे. कारण रिझर्व बँक प्रत्येक आठवड्याला बँकांकडून रिपोर्ट मागवून घेते तेंव्हा हा घोटाळा त्यांच्या का लक्षात आला नाही? याला जबाबदार कोण? आमच्या मते या सर्वांवर वचक राहिला तर सहकार क्षेत्र डळमळीत होणार नाही. कोणत्याही क्षेत्रात give & take चा व्यवहार बंद झाले तर प्रगतीच होईल.

आज महाराष्ट्रात सहकार क्षेत्र सामान्य माणसाने उभारलेले आहे. ते जर रिझर्व्ह बँकेच्या आडमुठे धोरणाने उध्वस्त होणार असेल तर, सहकारी बँकांनी रणशिंग फुंकले पाहिजे. त्यासाठी 'पतसंस्था परिवार' आपल्या पाठीशी आहे.